सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
बांगुर नगर लिंक रोड पोलीस ठाणे, मुंबई यांचे कार्यालय,
एम.टी. एन. एल बिल्डींग, माईंडस्पेस, एमडीपी क्रिक रोड,
मालाड (प), मुंबई 400064

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय
दूरध्वनी क्र.
022 -28769391
E-mail:
bangurnagarpolicestation@gmail.com

ps.bangurnagar.mum@mahapolice.gov.in

---

**" प्रेसनोट "** दि- 11/03/2026

**कागदाला पावडर लावून " भारतीय चलनी नोटामध्ये रूपांतर करून देतो " असे आमिष दाखवून हातचालाखीने फिर्यादीचे ताब्यातील पैसे घेऊन परराज्यात पळून गेलेल्या टोळीस गाजीपुर उत्तर प्रदेश येथून अटक केल्याबाबत........**

बांगुर नगर पोलीस ठाणे येथे फिर्यादी - श्री लल्लन राजकुमार महत्व वय 34 वर्ष धंदा व्यवसाय राठी रूम नंबर 35 भारत गॅस गोडाऊन लक्ष्मी नगर गोरेगाव पश्चिम मुंबई यांनी दिलेल्या फिर्याद वरुन गुन्हा नोंद रजिस्टर क्रमाक ९७/२०२६ कलम ३१८(४), ३(५) भा न्या संहिता 2023 अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

**गुन्हयाची थोडक्यात हकीकत** - नमूद गुन्ह्यातील अटक आरोपी यांनी फिर्यादीस केमिकल व पावडरचा वापर करून कागदाला भारतीय चलनी नोटांमध्ये रूपांतर करून देत असल्याचे भासवून फिर्यादीजवळ असलेले रोख रक्कम सात लाख रुपये दुप्पट करून देण्याचे आमिष देऊन कागदांचे दोन बंडलवर पावडर लावून ते खाकी कागदामध्ये गुंडाळुन त्याचे दोन पुढे बनवून फिर्यादीकडे दिले व फिर्यादी कडील रोख रक्कम सात लाख रुपये हातचालाकी करून घेवुन जावुन फिर्यादींची फसवणूक केली म्हणून फिर्यादींनी दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

**तपास** - पाहिजे आरोपीतांचे मोबाईल क्रमांकाचे तांत्रिक तपासाच्या अनुषंगाने आरोपी क्रमांक एक पवन उर्फ प्रकाश कुमार दिलीप प्रसाद गुप्ता वय 25 वर्ष व दुसरा आरोपी सर उर्फ राजसिंह मनोज सिंह प्रसाद वय 47 वर्ष हे आपले नावे बदलून तक्रारदार यांना वसई येथे डिसेंबर 2025 मध्ये भेटले व त्यांनी तेथे तक्रारदारास केमिकल पावडरचा वापर करून 500 रुपयाची एक नोटची दोन करून दाखवीली सदरची नोट मार्केटमध्ये चालल्यानंतर तक्रारदारांचे घरी दिनांक १२/०२/२०२६ रोजी येऊन त्यांची फसवणूक करून आरोपी क्रमांक एक हा बक्सर बिहार व आरोपी क्रमांक दोन हा गाजीपीर ,उत्तर प्रदेश येथे गेले असल्याबाबत तांत्रिक विश्लेषण अंतर्गत निष्पन्न झालेने त्यांचे लोकेशन बक्सर बिहार राज्य व गाजीपुर उत्तर प्रदेश असे दोन राज्यांमध्ये येत असल्याने मा वरिष्ठांची परवानगी घेऊन सपोनी सरळकर, सपोनी भदरगे, पोलीस शिपाई दळवी, पोलीस शिपाई गावित असे पथक तपासकामी पाठवण्यात आले होते.

नमूद आरोपीतांचा शोध घेऊन आरोपी हे सुखदेव पूर गाजीपुर जिल्हा गाजीपुर राज्य उत्तर प्रदेश येथील कोतवाली पोलीस ठाणे परिसरामध्ये मिळून आल्याने त्यांना स्थानिक पोलिसांच्या मदतीने कोतवाली पोलीस ठाण्यास ताब्यात घेऊन तेथे विचारणा केली असता त्यांचा गुन्हयात सक्रिय सहभाग निष्पन्न झाले व त्यांचेकडे फसवणूक केलेली रक्कमेबाबत विचारणा केली असता त्यांनी तपासात सहकार्य केले नाही म्हणून गुन्ह्यातील ठगी करून मिळवलेली मालमत्ता रोख रक्कम हस्तगत करण्यासाठी गुन्ह्यात तपासात सहकार्य करत नसल्यामुळे त्यांना अटक करण्यात आली

Scanned with OKEN Scanner

व स्थानिक न्यायालयांमध्ये आरोपीतास हजर करण्यात आले व आरोपीतांचे ट्रांजिट रिमांड प्राप्त करण्यात आले. ताब्यातील आरोपींना बांगुर नगर पोलीस ठाणे हजर करून त्या नमूद गुन्ह्यात रीतसर अटक करण्यात आली आहे.तसेच त्यांना विदयमान न्यायालयात हजर करुन दिनांक 14/03/2026 पर्यन्त पोलीस कोठडी प्राप्त करण्यात आली आहे.

अटक आरोपी चे नाव -

१. प्रकाश कुमार दिलीप प्रसाद गुप्ता वय 25 वर्ष धंदा बिगारी काम राठी. पुराना तारघर ज्योती चौक कोरीपूर्व बक्सर राज्य बिहार

2. राजसिंह मनोज सिंह प्रसाद वय 47 वर्ष धंदा नाही राठी सुखदेव पूर चौरस्ता गाजीपुर घाट जिल्हा गाजीपुर उत्तर प्रदेश

सदरची कारवाई मा.अपर पोलीस आयुक्त उत्तर प्रादेशिक विभाग मुंबई, मा. संदीप जाधव पोलीस उप आयुक्त परिमंडळ 11 मुंबई, मा.सहायक पोलीस आयुक्त गोरेगाव विभाग मुंबई, मा. रविंद्र आव्हाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक बांगुर नगर पोलीस ठाणे मुंबई व मा.युवराज दळवी पोलीस निरीक्षक (गुन्हे) बांगुरनगर पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली सपोनी संजय सरोळकर, सपोनि भदरगे व गुन्हे प्रकटीकरन पथकाने केली आहे.

-

Scanned with OKEN Scanner